# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३९०-२२ दिनांक २३/१२/२०२२

## घरफोडीच्या गुन्हयाचा ४८ तासाचे आत उलगडा करण्यात व सराईत सोनसाखळीचे गुन्हे करणा-या आरोपींना जेरबंद करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१ यांना यश.

नवघर पोलीस ठाणे हद्दिमध्ये राहणारे फिर्यादी नामे सिध्देश सदाशिव कांबळी हे दिनांक १७/१२/२०२२ रोजी घर बंद करुन त्यांचे कुटुंबासह शिर्डी येथे दर्शनासाठी गेलेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने बंद दरवाज्याचा कडी-कोयंडा तोडून ४,६३,०००/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे घरफोडी चोरी करुन नेले होते. सदर घटनेबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुरनं. ९७५/२०२२ भादंविसं. कलम-४५४, ४५७, ३८०, ५११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा युनिट १ यांनी समांतर तपास करुन तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदारा मार्फत प्राप्त माहितीचे आधारे गुन्हा करणारे आरोपी १) कमरुद्दीन सलाउद्दीन शेख २) आरीफ हुसैन खान दोन्ही रा. कुर्ला मुंबई या सराईरत आरोपींना निष्पन्न करुन अटक केली. सदर आरोपींकडून गुन्हयात चोरी झालेले ४,७५,०००/- रुपये किमंतीचे ११५ ग्रॅम सोने व रोख रक्कम रुपये १,५३,२००/- हस्तगत करुन गुन्हा करताना वापरलेली हत्यारे लोखंडी कटावणी व पकड जप्त केली आहेत.

त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दाखल झालेल्या चैन स्नॅचींग गुन्हयाचा गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा यांनी तांत्रीक विश्लेषन व गुप्त बातमीदारा मार्फत प्राप्त माहितीचे आधारे चैन स्नॅचींग करणारा मुख्य आरोपी जाफर गुलाब ईराणी ऊर्फ मुंडा यास अटक करुन त्याचेकडून २,५५,०००/- रुपये किमंतीचे सोने व ८०,०००/- रुपये किंमतीच्या ०२ मोटार सायकली (१) बुलेट २) यामाहा एफ.झेड.) हस्तगत केल्या आहेत. तसेच तपासात अटक आरोपी याने त्याचे इतर साथीदार याचेसह खालीलप्रमाणे १०
गुन्हे केले असल्याचे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पो.ठाणे | गुन्हा रजि.नंबर | कलम | अ.क्र. | पो.ठाणे. | गुन्हा रजि.नंबर | कलम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवघर | ८०१/२०२२ | ३९२, ३४ | ६ | कासार वडवली | ३५५/२०२२ | ३९२, ३४ |
| २ | काशिमीरा | ७२६/२०२२ | ३९२, ३४ | ७ | काशिमीरा | ३८८/२०२२ | ३७९ |
| ३ | काशिमीरा | ७४८/२०२२ | ३९२, ३४ | ८ | कोनगांव. | १६९/२०२२ | ३७९ |
| ४ | वालीव | १२५३/२०२२ | ३९२, ३४ | ९ | कोंडवा पूणे | ११२८/२०२२ | ३९२, ३४ |
| ५ | माणिकपूर | ४६०/२०२२ | ३९२, ३४ | १० | सायन मुंबई | ३७६/२०२२ | ३९२, ३४ |

अशाप्रकारे गुन्हे शाखा कक्ष-१ यांनी विविध गुन्हे उघडकीस आणुन अटक आरोपी यांचेकडून विविध गुन्हयातील एकूण ८,८३,२००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. श्री अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, स.पो.नि. पुष्पराज सुर्वे, सफौ. तांबे, सफौ. वाडीले, पोहवा/शिंदे, सफौ.संजय पाटील, पोहवा/लांडगे, पोहवा/थापा, पोहवा/गायकवाड, पोहवा/प्रफुल्ल पाटील, पोहवा/विकास राजपूत, पोहवा/समीर यादव, पोहवा/सचिन सावंत, पोहवा/संजय शिंदे, पोहवा/अविनाश गर्जे, पोशि/प्रशांत विसपुते, पोशि/सनी सुर्यवंशी यांनी केलेली आहे.



----ooo----